दिनांक:- २४/०८/२०२६.

# " प्रेस नोट "

## भांडुप पोलीस ठाणे कडून खुन, खुनाचा प्रयत्न व दरोडा सारख्या गंभीर गुन्ह्यातील २९ वर्षापासून फरार आरोपीस अटक केलेबाबत...

भांडुप पोलीस ठाणे येथील खून, खुनाचा प्रयत्न व दरोडा यासारख्या तीन गंभीर गुन्ह्यातील आरोपी रविंद्र उर्फ पापलेट एकनाथ विचारे यास मा. सत्र न्यायालय,मुंबई यांनी त्यास ०३ गुन्हयात फरार घोषित करून त्यावर स्थायी अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले होते. सदर आरोपीत इसमाचा शोध व गुन्हयाचा तपास भांडुप पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि दळवी व तपास पथक करत होते. गुन्हयाच्या तपासादरम्यान सदर आरोपी हा सन १९९७ पासून गेली २९ वर्ष फरारी असल्याने त्याचे ठावठिकाण्याबाबत कोणतीही उपयुक्त माहिती प्राप्त होत नव्हती. नमूद आरोपी हा त्याचे नाव व पत्ता बदलुन वास्तव्य करीत असल्याची गोपनीय माहितीनुसार सदर आरोपी हा सध्या सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे राहत असल्याची विश्वनीय माहिती प्राप्त झाली.

सदर माहितीच्या आधारे नमुद ठिकाणी जाऊन तसेच याच माहितीच्या आधारे तांत्रिक तपास करुन नमूद आरोपीतास आशुतोष लॉजमधून शिताफिने ताब्यात घेण्यात आले व त्याचेकडे चौकशी केली असता त्याने नमुद गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्यास भांडुप पोलीस ठाणे गु.र.क्र.६३२/१९९० या गुन्हयात अटक करुन मा. सत्र न्यायालय यांचेसमक्ष हजर केले असता मा. न्यायालयाने नमूद आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे.

**अटक आरोपीचे नाव व पत्ता** :-रविंद्र उर्फ पापलेट एकनाथ विचारे वय ६१ वर्ष रा.ठी. मु पो नागठाणे ता. सातारा जिल्हा, सातारा

### भांडुप पोलीस ठाणेस दाखल असलेले गुन्हे :-

१) गु.र.क्र. ६३२/१९९० कलम ३०२,१४७,१४८,१४९,३४ भादंवि,
२) गु.र.क्र. ०५/१९९१ कलम ३०७,३८ भादंवि,
३) गु.र.क्र. ३३२/१९८९ कलम ३९७,११४ भादंवि

**नमूद फरारी आरोपीबद्दल कोणतीही उपयुक्त माहिती उपलब्ध नसताना सुध्दा गोपनिय माहिती काढून त्यास ०३ गुन्ह्यात तब्बल २९ वर्षा नंतर अटक करण्याची उल्लेखनिय कामगिरी भांडुप पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडलेली आहे**.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मनोज शर्मा, मा. अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, मा. पोलीस उप आयुक्त, पूर्व परिमंडळ ३ श्री. अभयसिंह देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, भांडुप विभाग श्री. अजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/श्रीमती सपना श्रीरसागर, पोनि/नितीन चव्हाण यांचे प्रत्यक्ष देखरेखेखाली सपोनि/दिपक दळवी, पोह/राजेंद्र यादव, पोशि/विनायक झाडे, पोशि/सुमीत पोळ, मपोशि/रुपाली हाडवळे यांनी पार पाडली.

---